जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - दिनांक - ०४/०९/२०२४**

मुंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर

## वाहन चोरी करणारा सराईत चोरटा पोलीसांच्या जाळ्यात

मुंढवा पोलीस ठाणेचे हद्दीत तपास पथकाचे अधिकारी आर.व्ही.महानोर व तपास पथक पोलीस अंमलदार हे पेट्रोलिंग करीत असताना ते हडपसर रेल्वे स्टेशनजवळ मुंढवा ब्रिजखाली आले असता त्यांना एक इसम हा संशयीतरित्या हिरो होंडा कंपनीची पॅशन प्रो मोटार सायकल वर थांबलेला दिल्याने त्यांनी त्यास मोटार सायकल बाबतची कागदपत्रे विचारली असता तो उडवा उडवीची उत्तरे देवु लागल्याने त्यास ताब्यात घेवुन मुंढवा पोलीस ठाणे येथे आणुन त्याचेकडे अधिक तपास केला असता त्याने सदरची मोटार सायकल ही गेली ०२ महिन्यांपुर्वी गायराणवस्ती, केशवनगर, मुंढवा पुणे येथुन चोरी केल्याचे सांगीतले. त्याबाबत मुंढवा पोलीस ठाणेकडील अभिलेख तपासला असता गुन्हा रजि.नंबर ३०८/२०२४ बी.एन.एस.कलम ३०३(२) प्रमाणे दिनांक १५/०७/२०२४ रोजी दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानंतर सदर इसमास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव पत्ता **अमित अबधेश यादव,वय २२ वर्षे, रा.लेन नंबर १,दत्त मंदीराजवळ, रघुवीरनगर,वडगाव शेरी,पुणे मुळगाव दरभंगा,राज्य बिहार** असे असल्याचे सांगुन त्याचेकडे अधिक तपास केला असता पुणे शहर व पुणे ग्रामीण हद्दीतुन दोन मो.सा.ची चोरी केल्याचे कबुल करुन त्याने सदरच्या मो.सा. काढुन दिल्याने त्या दाखल गुन्ह्याचे पुरावेकामी जप्त करण्यात आलेल्या आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त पुर्व विभाग श्री.मनोज पाटील, मा.पोलीस उप आयुक्त,श्री.आर.राजा, मा.सहा.पोलीस आयुक्त श्रीमती अश्विनी राख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.निळकंठ जगताप, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.बाबासाहेब निकम यांचे मार्गदर्शनाखाली तपासपथक प्रमुख आर.व्ही. महानोर पोलीस अंमलदार राजु कदम,शिवाजी जाधव, विनोद साळुंखे,राहुल मोरे,योगेश गायकवाड,पोपट माने,अक्षय धुमाळ,स्वप्निल रासकर, गणेश सोनवणे यांनी केलेली आहे.